**महाराष्ट्र शासन**

गृह (परिवहन) विभाग,

मंत्रालय, (मुख्य इमारत) 2 रा मजला, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई 400 032.

022-22029959 home_transport2@maharashtra.gov.in

क्र.एमव्हीआर 0920/प्र.क्र.118/परि-2 दि.06.11.2020.

प्रति,

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय :- पर्यटक/प्रवासी वाहतूक करताना खाजगी प्रवासी बसेसकरीता सुधारित मानक कार्यपध्दतीबाबत** (Standard Operating Procedure).

**संदर्भ** - 1) आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.पआका-0120/2-ब/नस्ती क्र.15/2020/ जा.क्र.7956, दि.01.10.2020.

2) शासनपत्र समक्रमांक दि.15.09.2020.

3) आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.एमव्हीआर-0820/सीआर-222/का-2(2)/ 2020 जा.क्र.7075, दि.01.09.2020.

4) महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचे आदेश क्र.DMU/2020/CR.92/DIsM-1, दि.31.08.2020.

उपरोक्त विषयांकित संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने पर्यटक/प्रवासी वाहतूक करताना खाजगी प्रवासी बसेसकरीता खालीलप्रमाणे मानक कार्यपध्दतीस मान्यता देण्यात येत आहे:-

1) खाजगी प्रवासी बस वाहतूकदारांनी कोव्हीड-19 महामारीच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने तसेच परिवहन विभागाने निर्गमित केलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

2) महाराष्ट्र मोटार वाहन नियम, 1989 च्या नियम 20 (1) (x) मधील तरतुदीनुसार लोकसेवा वाहनाच्या प्रत्येक चालकाने आपले वाहन स्वच्छ व निर्जंतुकीकरण केलेल्या स्थितीत ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार कंत्राटी बसच्या चालकाने त्यातून प्रवास करणारा पर्यटक गट बदलताना तसेच प्रवासाच्या प्रत्येक दिवशी/प्रत्येक फेरीअंती प्रवासी बसचे निर्जंतुकीकरण करावे.



Scanned with CamScanner

3) बसचे आरक्षण कक्ष/कार्यालय, चौकशी कक्ष यांची वेळोवेळी स्वच्छता करावी तसेच सदर ठिकाणी उपस्थित कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर असताना मास्क, सॅनिटायझरचा वापर करावा, बसेस जिथे उभ्या राहतात त्याठिकाणी गर्दी होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

4) मास्क परिधान न केलेल्या प्रवाशांना बसमध्ये प्रवेश देण्यात येऊ नये, बसच्या प्रवेशव्दाराजवळ सॅनिटायझर ठेवण्यात यावे तसेच बसमध्ये प्रवाशांच्या वापरासाठी काही .अतिरिक्त मास्क ठेवण्यात यावेत.

5) बसमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रवाशांची थर्मल-गन द्वारे तपासणी करण्यात यावी. एखादया प्रवाशास ताप, सर्दी-खोकला इ. प्रकारची कोव्हीड-19 आजाराची प्राथमिक लक्षणे दिसत असल्यास, अशा प्रवाशांना बसमधून प्रवास करण्यास प्रतिबंध करण्यात यावा.

6) सर्व प्रकारच्या खाजगी कंत्राटी बस वाहनांमधून 100 टक्के क्षमतेने पर्यटक/प्रवासी वाहतूकीस परवानगी देण्यात यावी.

7) चालकाने प्रवासादरम्यान जेवण/अल्पोपहार/प्रसाधनगृहाचा वापर याकरिता बस थांब्यावरील ठिकाणे स्वच्छ असल्याची खातरजमा करावी.

8) बसमध्ये चढताना/उतरताना तसेच प्रवासादरम्यान खानपानाकरिता व प्रसाधनगृहाच्या वापराकरिता बस थांबविली असताना प्रवाश्यांनी शारिरीक अंतर (social distancing) ठेवण्याची दक्षता घेण्याबाबत प्रवाश्यांना सूचना देण्यात याव्यात.

9) प्रवाशांना बसमध्ये कचरा फेकू देवू नये, कचऱ्यासाठी कचराकुंडीचा वापर करण्याच्या व बसमध्ये स्वच्छता राखण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

10) प्रवासी बसचे निर्जंतुकीकरण करणे तसेच त्याचे अभिलेख ठेवणे याची जबाबदारी परवानाधारकाची असेल.

11) उपरोक्त सुचनांचे पालन न केल्यास परवानाधारकाविरुध्द मोटार वाहन अधिनियम, 1988, केंद्रीय मोटार वाहन नियम, 1989 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतूदीनुसार उचित कायदेशिर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

12) केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार तसेच प्रशासकीय दृष्टीकोनातून उपरोक्त सुचना/कार्यपध्दतीत आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यात येईल.

वरील कार्यपध्दतीची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

(नि.ज्यो.घिरटकर)
कक्ष अधिकारी, गृह (परिवहन) विभाग

प्रत- निवडनस्ती परिवहन-2.

F:\SO\Corona\आंतरजिल्हा वाहतूक.docx



Scanned with CamScanner